# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २९५/२००८/ दिनांक :

प्रति,

१) श्री. शिवाजी एकनाथ पाटील,
मु. पो. गवाण, ता. तासगांव, अर्जदार
जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडळ कार्यालय, विश्रामबाग , सांगली. विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, ग्रामीण विभाग, सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, उप विभाग सावळज, जि. सांगली

**कोरम :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष यांचे तर्फे दिनांक : ०७.०३.२००९

सदरील अ नमुन्यातील अर्ज हा दि. १७.१२.२००८ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला. यातील निवेदनाप्रमाणे अर्जदार ग्राहक श्री.शिवाजी एकनाथ पाटील, रा. गवाण, ता. तासगांव यांनी गट क्र. ३९३ मध्ये शेतीपंपास वीज मंजुरी मिळणे बाबत दि. १९.६.२००३ रोजी अर्ज केला होता व त्यांचा अनुक्रमांक २०६६ असा नोंदविण्यात आला. त्यांचे म्हणणे की, वितरण कंपनीने वीज मंजुरी देण्यास टाळाटाळ केली.

परंतु किसान ग्राहक संघटना, तासगांव यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे अर्ज दाखल केल्यानंतर गट क्र. ९९३ मध्ये ५ एचपीच्या शेतीपंपास विद्युत पुरवठ्याची दि. २६.२.२००८ रोजी वि.प.कडून मंजुरी मिळाली. तसेच एस.ओ.पी. प्रमाणे नुकसान भरपाई मिळावी असा आदेश त्यांना मिळाला. परंतु तरीदेखील प्रत्यक्ष वीज जोडणी वि.प.कडून झाली नाही. सदरच्या अर्जात दर्शविल्याप्रमाणे गट क्र. ९९१ मध्ये देखील त्यांना मोटरपंपासाठी विद्युत पुरवठा मिळावा म्हणून अर्ज केला होता व अंतर्गत तक्रार निवारण कक्षानेही दि. १२.३.२००८ रोजी मंजुरी दिली आहे. अर्जदाराचे म्हणणे की गट क्र.९९१ मध्ये जरी वीज भार मंजुरी मिळाली असली तरी त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसलेने एकदम दोन वीज जोडण्या त्यांना घेता येत नाही.

अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे, मा. अंतर्गत कक्षाने दि. १२.३.२००८ रोजी त्यांचे दि. १९.६.२००३ च्याअर्जाप्रमाणे शेतीपंपास वीज मंजूर करण्यास झालेल्या विलंबा बाबत एस.ओ.पी. प्रमाणे नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिलेले आहेत.

असे असतांनाही, सदरील अर्जदाराने या मंचाकडे सांगली अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे दि. १२.३.२००८ च्या आदेशानुसार वितरण कंपनीचे वीज मंजूर व विद्युत पुरवठा करणे बाबत केलेल्या विलंबा बाबत एस.ओ.पी. प्रमाणे त्यांना नुकसान भरपाई मिळणे बाबत मागणी केलेली आहे. अशी नुकसान भरपाई दि. २०.१.२००५ ते २६.२.२००८ या कालावधीसाठी रु. १००/– प्रति आठवडा या प्रमाणे मागणी केलेली आहे. तसेच दि. ६.१०.२००८ रोजी दुसऱ्या जोडणी बाबत चलन भरुन दि. १९.२.२००९ रोजी चाचणी अहवाल दिला आहे व त्यामध्ये एस.ओ.पी. प्रमाणे नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे.

सदरील तक्रार अर्जावर वि.प. यांना नोटीस देवून म्हणणे दाखल करण्याची संधी दिली. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, सांगली यांनी दिलेल्या म्हणण्याप्रमाणे तक्रार अर्जदार श्री. शिवाजी एकनाथ पाटील यांचेकडून गवाण येथील गट क्र. ९९१ व ९९३ मध्ये शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा मिळणेसाठी अर्ज सादर केले होते हे मान्य केले आहे. गट क्र. ९९३ मध्ये विद्युत पुरवठ्यासाठी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. १६.१.२००८ रोजी तक्रार अर्ज सादर केला होता व त्याबाबत दि. २६.२.२००८ रोजी त्यांनी पैंसे भरल्यासाठी चलन देण्यात आले. पुढे दि. ६.१०.२००८ रोजी अर्जदाराने पैंसे भरले आहेत. तद्नंतर दि. १३.१०.२००८ रोजी संच मांडणी बाबत अहवाल सादर केला. परंतु जागेवर पाहणी केली असता, कोणताही संच मांडणी केलेला आढळला नाही. संबंधित विद्युत पुरवठ्यासाठी लघुदाब वाहिनी ०.१५ कि.मी. माहे डिसेंबर २००८ मध्ये पूर्ण केलेली आहे. तक्रारदाराकडून संच मांडणेचा अहवाल सादर केल्यानंतर त्वरीत विद्युत पुरवठा करण्यात येईल असे निवेदन दिले. तसेच अर्जदाराने गट क्र ९९१ मध्ये विद्युत पुरवठा करणेसाठी संच मांडणी अहवाल दि. ११.१२.२००८ रोजी सादर केला व सदर ठिकाणी कृती मानके प्रमाणे विद्युत पुरवठा करणेत येईल असे निवेदन दिले.

पुढे सदरील अर्जदाराची सुनावणी सांगली येथील कार्यालयात ठेवण्यात आली व त्याप्रमाणे अर्जदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी अर्जदाराची बाजू मांडली. या उलट, वि.प.तर्फे सहाय्यक अभियंता श्री. उंबरजे व श्री. एस.के. पाटील, कनिष्ठ अभियंता सांगली यांनी बाजू मांडली. तसेच पुढे दि. २७.२.२००९ रोजी सहाय्यक अभियंता, सावलज यांनी निवेदन दिले व संयुक्त पाहणी अहवाल कागदपत्रें हजर केली.

त्याप्रमाणे अर्जदार श्री. शिवाजी एकनाथ पाटील यांचे गट क्र. ९९१ व ९९३ मध्ये दि. १२.०२.२००९ रोजी त्यांचे शेतीपंपाला विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे असे सांगण्यात आले. सुनावणीवेळी अर्जदार प्रतिनिधी श्री. खापरे यांनी निवेदन केले की, मुळ अर्जदार यांनी दिलेल्या माहितीवरुन अर्जदाराचे दोन्ही शेतीपंपाला विद्युत पुरवठा दिलेला आहे. परंतु श्री. खापरे यांनी एस.ओ.पी. प्रमाणे नुकसान भरपाईची मागणी केली. या प्रकरणामध्ये आमच्या समोर आलेल्या कागदपत्रांवरुन व दोन्ही बाजूंचे पक्षकारांनी सादर केलेल्या निवेदनावरुन खालील मुद्दे आमच्या निष्कर्षास उद्‌भवतात.

मुद्दा क्र. १ : अर्जदार यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांचे गट क्र. ९९१ मध्ये दि. १२.२.२००९ रोजी दिलेल्या वीज जोडणी संबंधात नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क आहे काय ? असा हक्क असल्यास नुकसान भरपाई किती ?

उत्तर : नुकसान भरपाई मिळणेचा हक्क हा वीज नियामक आयोग अधिनियम २००६ मधील विनियम ६:६ प्रमाणे मुदती बाहे गेल्याने भरपाई देता येत नाही.

मुद्दा क्र २ : अर्जदार यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांचे गट क्र. ९९३ मध्ये दि. १२.२.२००९ रोजी दिलेल्या वीज जोडणी संबंधात नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क आहे काय ? असा हक्क असल्यास नुकसान भरपाई किती ?

उत्तर : नुकसान भरपाई मिळणेचा हक्क हा वीज नियामक आयोग अधिनियम २००६ मधील विनियम ६:६ प्रमाणे मुदती बाहे गेल्याने भरपाई देता येत नाही.

मुद्दा क्र. ३ : आदेश ?

उत्तर : अखेरच्या आदेशाप्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

अर्जदाराने दि. १९.६.२००३ रोजी शेतीपंपास विद्युत पुरवठा मिळणे बाबत अर्ज केला होता. म्हणजे महाराष्ट्र वीज नियामक आयोग विद्युत पुरवठा संहिता व कृतीची मानके २००५ ची अंमलबजावणी होण्याअगोदर अर्ज केलेला होता. आयोगाच्या वरील अधिनियमाची अंमलबजावणी ही दि. २०.१.२००५ पासून सुरु करण्यात आलेली आहे. सबब अर्जदारास कृती मानकेमध्ये निर्देशित केल्याप्रमाणे आदेश प्राप्त झाल्यापासून ग्राहकाने करावयाच्या खर्चासंबंधी त्यास कळविणेचा कालावधी ज्या संबंधात विद्युत मेन्सचा विस्तार करण्याची आवश्यकता आहे त्यामध्ये ३० दिवसांचा आहे. त्यावेळ पासून नुकसान भरपाई मिळणे बाबत अर्जदारातर्फे निवेदन करण्यात आले. या प्रकरणामध्ये दि. २६.२.२००८ रोजी चलन दिलेले आहे. सबब दि. २०.१.२००५ ते २६.२.२००८ या काळामध्ये प्रति आठवडा रु. १००/- प्रमाणे नुकसान भरपाईची मागणी आहे. मात्र या प्रकरणामध्ये महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००६ मधील विनियम ६:६ याचा विचार करता, अशी नुकसान भरपाई ही नुकसान भरपाईचा हक्क प्राप्त झाल्यापासून २ वर्षाचे कालावधीमध्ये मागणे आवश्यक आहे, अन्यथा अशी तक्रार या मंचास विचारात घेता येत नाही अशी त्यामध्ये तरतूद आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये दि. २०.१.२००५ नंतर २ वर्षांचा कालावधी दि. २०.१.२००७ रोजी संपुष्टात येतो. मात्र अर्जदाराने क्ष अर्जातील तक्रार अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. १६.१.२००८ रोजी`लेली आहे. सबब ता. २०.१.२००७ पर्यंत व पुढे दि. १६.१.२००८ पर्यंत अर्जदाराने आपल्या नुकसान भरपाईच्या हक्काबाबत मागणी न केल्याने त्यांना

नुकसान भरपाई मिळण्याचा विनियम ६:६ प्रमाणे हक्क नाही व त्याबाबत या मंचासही त्यांच्या त्या तक्रारीची दखल घेण्याचा अधिकार पोहोचत नाही.



सबब दोन्ही गट क्रमांकातील शेतीपंपाच्या विद्युत पुरवठ्या बाबत कृती मानके प्रमाणे जी नुकसान भरपाई मागितलेली आहे ती नुकसान भरपाई मागण्याचा त्यांना आता हक्क नाही व ती देण्याबाबत या मंचास अधिकार नाहीत. सबब वरील दोन्ही मुद्दा क्रमांकावर आम्ही नकारार्थी उत्तर दिले आहे.

या प्रकरणामध्ये अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचा आदेश हा दि. १२.३.२००८ रोजीचा आहे. पुढे अर्जदाराचे गट क्र. ९९३ मध्ये शेतीपंपाबाबत दिलेल्या चाचणी अहवाला बाबत हा ता. २९.९.२००८ रोजीचा आहे. परंतु त्याबाबत प्रत्यक्ष संयुक्त अहवालाप्रमाणे दि. ९.१.२००९ रोजी प्रत्यक्ष जागेवर बोअरवेल असून त्या ठिकाणी मीटरपेटी बसविलेली नव्हती. तसेच विद्युत संचही मांडलेला नव्हता. त्याचप्रमाणे गट क्र. ९९१ मध्ये ५ एचपीच्या शेतीपंपाबाबत ता. ९.१.२००९ रोजी संयुक्त तपासणी अहवाल दिला असून त्याप्रमाणे समक्ष जागेवर बोअरवेल असून त्या ठिकाणी विद्युत पंप बसविलेला नाही. तसेच विद्युत संचाची मांडणी केलेली नाही. यावरुन असे दिसून येते की, दि. ९.१.२००९ पर्यंत अर्जदाराने टेस्ट रिपोर्टप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर कोणतीही कार्यवाही केलेली नव्हती.

परंतु दि. २७.२.२००९ रोजी सहाय्यक अभियंता, सावळज यांनी दिलेल्या अहवालाप्रमाणे दि. १२.२.२००९ रोजी अर्जदाराच्या दोन्ही शेती वीज पंपांना विद्युत पुरवठा केलेबाबत अहवाल दिला आहे. विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे ही बाब श्री. खापरे ग्राहक प्रतिनिधी यांनी सुनावणीवेळी मान्य केलेली आहे. सबब चाचणी अहवाल दिल्यानंतर विहीत कालावधीमध्ये विद्युत पुरवठा झालेला आहे. परिणामी त्याबाबत नुकसान भरपाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

वरील कारणमिमांसेप्रमाणे अर्जदाराचा नुकसान भरपाई बाबतचा सदरील अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. तसेच अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्या निर्णयामध्ये संदिग्धरित्या एस.ओ.पी. प्रमाणे नुकसान भरपाई देण्यात यावी असा दिलेला आदेशही रद्द करणे क्रमप्राप्त ठरते. सबब आदेश.

## आदेश

१) अर्जदाराचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२) तसेच अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांनी दि. १२.३.२००८ रोजी दिलेल्या आदेशामध्ये एस.ओ.पी. प्रमाणे नुकसान भरपाई देण्याबाबतचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( के.वाय. जगताप )
अध्यक्ष
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : ०६.०३.२००९

जी.सी. लेले, सदस्य :

एस.आर. बांबळे, सदस्य सचिव :